# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई -: मेल आयडी-sceapune@gmail.com


जा.क्र.रासनिप्रा/अ व ब वर्ग सह.सं./निवडणुक मा.सु./२५८४/२०२०.
दिनांक २२/०५/२०२०.

प्रति,

जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी (सर्व)
तालुका सहकारी निवडणुक अधिकारी (सर्व)

**विषय:-'अ' व' ब'वर्गातील सहकारी संस्थांचे समिती निवडणुक प्रक्रीयेमध्ये अनुसरावयाच्या सर्वसाधारण मार्गदर्शक सुचना**

**संदर्भ** :-१. महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम २०१४.
२. महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) (प्रथम सुधारणा) नियम २०१८ दिनांक ०६/०८/२०१८
३.प्राधिकरणाचे जा.क्र. रासनिप्रा/ अ व ब वर्ग सह.सं/निवडणूक मा.सु/९४९/२०१४ दिनांक ०२.१२.२०१४.
४.प्राधिकरणाचे जा.क्र. रासनिप्रा/ अंतिम मतदार यादी/ २८९९/ २०१५ दिनांक ०२.०३.२०१५

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब अन्वये राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका घेण्याची जबाबदारी राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाकडे सोपविण्यात आलेली आहे. सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांच्या निवडणूकांसाठी निवडणुक नियमातील नियम ४ मध्ये वर्गवारी करण्यात आलेली आहे. त्यातील 'अ' व 'ब' वर्गवारीमधील सहकारी संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी नियम ७५ व नियम ७६ वगळता निवडणुक नियमांतील इतर सर्वच नियम सदर संस्थांसाठी लागू होतात.

महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम २०१४ आणि महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) (प्रथम सुधारणा) नियम २०१८ मधील नियम ४ मध्ये 'अ' व 'ब' वर्गात मोडणाऱ्या संस्था प्रकार नमूद केलेले आहेत.

सदर संस्थांच्या निवडणुका व्यवस्थितपणे व पारदर्शक पद्धतीने पार पाडण्याकरीता प्राधिकरणाकडील संदर्भ क्र.३ व ४ मधील सुचना अधिक्रमित करण्यात येत आहेत.

<u>**सहकारी संस्थेने करावयाची कृती**</u> :-

१. महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम २०१४ मधील नियम ५(२) अन्वये नमुना ई-२ मध्ये माहिती जिल्हा सहकारी निवडणुक अधिकाऱ्यास देणे.
२. ई-२ नमुन्यासोबत संस्थेचे मंजुर उपविधीची प्रत जिल्हा सहकारी निवडणुक अधिकाऱ्यास देणे.
३. संस्थेने प्राथमिक मतदार यादी मुदत संपण्याचा दिनांक किंवा प्राधिकरणाने घोषित केलेल्या अर्हता दिनांकावर तयार करावयाची आहे. ती तयार करताना खालीलप्रमाणे कृती करावी.
   अ. महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम २०१४ मधील नियम ६,७,९,१०,११ मधील तरतुदी विचारात घेऊन अचुक, निर्दोष व पारदर्शक पद्धतीने प्राथमिक मतदार यादी तयार करावी.

ब. प्राथमिक मतदार यादीत नाव समाविष्ट करताना संस्थेचा सभासद महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २६(१) व कलम २७ व कलम ४८ अन्वये पात्र असावा. तसेच कलम ७३ कअ अन्वये कसुरदार (defaulter) नसावा. उपविधीमधील तरतुदीनुसारही मतदार यादीत नाव समाविष्ठ करण्यास पात्र असावा.

क. क्रियाशील सभासदत्व ही बाब या निवडणुकीसाठी लागू आहे. याची प्राथमिक मतदार यादी तयार करताना कटाक्षाने नोंद घ्यावी.

ड. संस्थेच्या सचिव / व्यवस्थापक / कार्यकारी संचालक / मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संस्थेचे 'आय' नमुना नोंदवहीवरुन महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) नियम २०१४ मधील नियम ७ किंवा १० अन्वये निवडणुक नियमातील 'इ-३' नमुन्यात प्राथमिक मतदार यादी उपविधीतील तरतुदीनुसार मतदारसंघनिहाय वर्णानुक्रमे (Alphabetically) तयार करुन तिच्या ४ प्रिंटेड प्रती व डिजिटल फॉर्ममध्ये तसेच मराठीमध्ये ती जिल्हा सहकार निवडणुक अधिकारी यांना सादर करावी व त्याच्या प्रती संस्थेच्या नोटीस बोर्डावर ठळकरित्या मुख्य कार्यालयासह शाखा कार्यालयांवर प्रसिध्द कराव्या. तसेच DCEO / TCEO चे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करावी. याबाबत स्थानिक वर्तमान पत्रातही प्राथमिक मतदार यादी प्रसिध्दीचे निवेदन प्रसिध्द करावे.

इ. मतदार यादी तयार करण्याची जबाबदारी संस्थेच्या अधिकाऱ्याची असल्यामुळे त्याने सहकारी कायद्यातील कलम १४६ (ई-२), (ह-१), (के), (प) व (क्यू) तरतुदी गंभीरपणे विचारात घेऊन यादी तयार करावी.

फ. सदर तरतुदींचे उल्लंघन झाल्यास कायद्यातील कलम १४७ मधील उपकलम (इ-२), (ह-१), (के), (प) व (क्यू) अनुसार संस्थेच्या जबाबदार अधिकाऱ्यावर कठोर शिक्षेची कारवाई होऊ शकते याची त्याने गांभीर्याने दखल घ्यावी.

ग. सदर यादी प्राधिकरणाच्या किंवा सहकार आयुक्तांच्या, साखर आयुक्तांच्या, वस्त्रोद्योग संचालक, आयुक्त दुग्ध विकास, आयुक्त मत्स्य विकास, आयुक्त पुशसंवर्धन शासनाच्या व संस्थेच्या वेबसाईटवरही प्रसिद्ध करावयाची आहे.

| अ.क्र | कार्यालयाचे नाव व फोन नं. | वेबसाईटचे नाव | फोन नं. |
|---|---|---|---|
| १. | सहकार आयुक्त व निबंधक कार्यालय | https://sahakarayukta.maharashtra.gov.in | (०२०)२६१२२८४६/४७ |
| २. | साखर आयुक्त कार्यालय | https://www.mahasugarcom.gov.in | (०२०) २५५३८०४१ |
| ३. | वस्त्रोद्योग आयुक्त कार्यालय | www.dirtexmah.gov.in | (०७१२) २५२६४०८<br>(०७१२) २५६१२४७<br>(०७१२) २५३७९२७ |
| ४. | दुग्ध आयुक्त कार्यालय | dairy.maharashtra.gov.in | (०२२) २४९३७०६४<br>(०२२) २४९३७०८७ |
| ५. | आयुक्त मत्स्य विकास | https://fisheries.maharashtra.gov.in | (०२२) २२८२१२३९ |
| ६. | पशुसंवर्धन आयुक्त | https://ahd.maharashtra.gov.in | (०२०)२५६९०४८४,<br>(०२०) २५६९०४८० |

ट. मतदानाची टक्केवारी वाढण्याच्या दृष्टीने सभासदांचे सोईनुसार मतदान केंद्रांची संख्या पर्याप्त असणे गरजेचे आहे. केवळ मतदान केंद्रांची संख्याच नव्हे तर ती मतदान केंद्रे संस्थेचे कार्यक्षेत्रातील विविध ठिकाणी उपलब्ध असणे आवश्यक आहे. संस्थेचे शाखानिहाय मतदान केंद्र ठेवल्यास सभासदांची गैरसोय होणार नाही. मतदान केंद्रनिहाय मतदार यादी तयार करावी.

म. ज्या सहकारी संस्थांच्या सभासद संस्था आहेत, त्याबाबत मतदार यादी निवडणुक नियम १०(२) अन्वये जिल्हा सहकारी निवडणुक अधिकाऱ्याने करावी.

४. जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी यांनी संबंधीत संस्थेस प्राथमिक मतदार यादी उपरोक्त प्रमाणे तयार करणेचे व प्राथमिक मतदार यादी जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी यांचेकडे दाखल करावयाच्या दिनांकाचे सुचनापत्र निर्गमित करावे. संस्थेकडुन प्राथमिक मतदार यादी प्राप्त झाल्यानंतर जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी यांनी सदर यादीवर १० दिवसांच्या आत हरकती मागविणे संबंधात निवडणुक नियमातील नियम ८ मध्ये तरतुद केलेली आहे. मात्र जिल्हा सहकारी निवडणुक अधिकाऱ्याने त्याच्या कडील जिल्ह्यातील 'अ' व 'ब' वर्गामधील निवडणुकीस पात्र संस्थांची यादी प्रथम तयार करावी. दिनांक निहाय प्रथम पात्र संस्थेस प्रथम प्राधान्य देऊन मतदार यादीचा कार्यक्रम प्रसिध्द करावयाचा आहे. कार्यक्रम प्रसिध्दी करताना एकाच वेळेस अनेक संस्थांचे कार्यक्रम येणार नाहीत अशा पध्दतीने कार्यक्रम लावण्यात यावेत. जेणेकरुन प्राप्त हरकतींवर सुनावणी घेताना सुनावणीस पुरेसा वेळ मिळेल याची दक्षता घ्यावी.

५. प्राथमिक मतदार यादी प्रसिध्दी करण्यापूर्वी या मतदार यादी कार्यक्रमाची माहिती प्राधिकरणास आगाऊ सादर करावी व ती प्राप्त झाल्याची खात्री करावी. प्राधिकरणास अनभिज्ञ ठेवुन कार्यक्रम प्रसिध्द करु नये. ह्याप्रमाणे नियोजन करताना उक्त नियमातील १० दिवसांचे आत यादी प्रसिध्द करण्याच्या तरतुदीचे उल्लंघन होणार नाही याचीही दक्षता घेणे गरजेचे राहील.

६. मतदार यादीचा कार्यक्रम जाहिर वर्तमान पत्रात प्रसिध्द करणेत यावा. त्यात हरकती मागविण्याबाबतचा कालावधी, ठिकाण, वेळ, हरकती स्विकारणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव व पद इ. बाबी स्पष्टपणे नमूद कराव्यात. तसेच ज्या संस्थेच्याबाबत हरकती मागविण्यात येत आहे त्या संस्थेचे नाव, पत्ता, नोंदणी क्रमांक इ. तसेच जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी यांचा कार्यालयाचा पत्ता, दुरध्वनी क्रमांक, भ्रमणध्वनी, ई-मेल याही बाबी नमुद करुन ई-मेलव्दारे हरकती स्विकारण्यात येतील (शक्य असल्यास) असेही नमुद करावे. सदर प्राप्त हरकतींवर सुनावणी केव्हा, कोठे, किती वाजता होणार आहेत याचा गोषवारा दिल्यास तसेच हरकती अंती सदर नमुद बाबी विचारात घेऊन सर्व संबंधीतांना पुराव्यानिशी हजर राहण्याबाबत जाहिर नोटीशीत नमुद केल्यास त्यांची सुनावणीची प्रक्रिया सुलभ होऊ शकते म्हणुन या सर्व बाबी विचारात घेऊन मतदार यादी कार्यक्रम प्रसिध्द करावा. हरकतींवरील सुनावणीनंतर निर्णय घेण्याचा दिनांक, अंतिम मतदार यादी प्रसिद्धीचा दिनांक इ. बाबी नमुद कराव्यात. सदर तारखा नियम ८ मधील तरतुदीनुसार असाव्यात.

७. प्रारुप मतदार यादी सादर केल्यापासुन ते अंतिम मतदार यादी प्रसिध्द होईपर्यंतचा कार्यक्रम सर्वसाधारणपणे ३५ दिवसांचा आहे. जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी यांनी सदर मतदार यादी अंतिम करणेपूर्वी सदर संस्थेवर निवडणुक निर्णय अधिकारी नेमणुक करणेबाबत प्रस्ताव अंतिम मतदार यादी प्रसिध्द करावयाच्या दिनांकाच्या २१ दिवस अगोदर प्राधिकरणास सादर करावा म्हणजे प्राधिकरणाकडुन मतदार यादी अंतिम होण्याच्या दिनांकापुर्वी निवडणुक निर्णय अधिकाऱ्याची नेमणुक होऊ शकेल.

८. अशाप्रकारे निवडणुक निर्णय अधिकारी नियुक्त झाल्यानंतर निवडणुक निर्णय अधिकारी ने नियम १८ नुसार तात्काळ निवडणुक कार्यक्रम तयार करुन तो जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी यांचे अभिप्रायासह प्राधिकरणास ई-मेलव्दारे तात्काळ सादर करावा. सदर कार्यक्रमास प्राधिकरणाकडुन मान्यता प्राप्त झाल्यानंतर तो जाहिर वर्तमान पत्रात देखील प्रसिध्द करावयाचा आहे. तसेच वेबसाईटवरही प्रसिध्द करणे गरजेचे आहे.

९. निवडणुकीस मोठया प्रमाणावर पात्र संस्थांची संख्या पाहता जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी यांनी नियोजन करणे आवश्यक आहे. त्यामुळे जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी यांनी खालीलप्रमाणे कृती कार्यक्रम तयार करुन प्राधिकरणास ८ दिवसांत सादर करावा.

| जिल्ह्याचे नाव | संस्थेचे नाव व पत्ता | संचालक मंडळाची मुदत संपल्याची तारीख | संस्थेकडुन प्रारुप मतदार यादी प्राप्त करावयाचा दिनांक | प्रारुप मतदार यादी प्रसिध्दीची संभाव्य तारीख | अंतीम मतदार यादी प्रसिध्दीची संभाव्य तारीख | निवडणुक कार्यक्रम प्रसिध्दीचा संभाव्य दिनांक | अंदाजित मतदारांची संख्या | अंदाजित मतदान केंद्र संख्या | अंदाजित अपेक्षीत मनुष्यबळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. |

सदर कृती कार्यक्रम तयार करताना निवडणुक कार्यक्रम घोषीत करण्याच्या संभाव्य तारखा विचारात घेऊन जिल्ह्यात उपलब्ध असलेल्या निवडणुक निर्णय अधिकाऱ्याच्या संख्या विचारात घेऊन व निवडणुक प्रयोजनार्थ उपलब्ध मनुष्यबळ विचारात घेऊन कृती कार्यक्रम तयार करावा व संस्थानिहाय मतदारांची संख्या, मतदान केंद्र, आवश्यक मनुष्यबळ यांचाही गोषवारा तयार करावा.

१०.संस्थेचे पोटनियम दुरुस्त झालेले नसल्यास कायद्यातील कलम ७३ 'ब' व ७३ 'क' अन्वये विहित केल्याप्रमाणे राखीव जागांच्या निवडणुका घेणे अनिवार्य राहिल.

११.नियम १८ अन्वये सुरु झालेली निवडणुक प्रक्रिया निवडणुक नियमात दिलेल्या नियम ७५ व ७६ वगळता इतर सर्व नियमांचा विचार करुन व तंतोतंत पालन करुन प्रत्यक्ष निवडणुक प्रक्रिया पार पाडावयाची आहे. सदर नियम स्वयंस्पष्ट असल्यामुळे त्यावर वेगळे मार्गदर्शन करण्याची आवश्यकता नाही.

१२.निवडणुक निर्णय अधिकारी यांनी निवडणुक कार्यक्रम नियम १८ नुसार पार पाडल्यानंतर निवडून येणाऱ्या संचालक मंडळाची निवड झाल्याची घोषणा करुन नवनिर्वाचित संचालकांची यादी जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी यांचेमार्फत प्राधिकरणास ई-१७ नमून्यात सादर करण्यात यावी. तसेच नियम ६४ नुसार जिल्हा सहकारी निवडणुक अधिकाऱ्याने संचालक मंडळाची निवड झाल्याचे घोषणापत्राची प्रत त्याच्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर आणि संस्थेच्या नोटीस बोर्डावर प्रसध्दि करावी व त्याची प्रत प्राधिकरणास पाठवावी.

१३.नियम ७७ नुसार निवडणुक निर्णय अधिकारी यांचीच पदाधिकारी निवडीचे सभेच्या अध्यासी अधिकारी म्हणुन नेमणुक जिल्हा सहकारी निवडणुक अधिकाऱ्याने करावी व अध्यासी अधिकाऱ्याने नवनिर्वाचित संचालकांमधुन पदाधिकारी निवडीची प्रक्रिया करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जिल्हा सहकारी निवडणुक अधिकाऱ्यामार्फत प्राधिकरणास कळवावा.

१४. महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणुक) (प्रथम सुधारणा) २०१८ मधील नियम १८ नुसार संबंधीत सहकारी संस्थेचा निवडणूक कार्यक्रम विहीत मुदतीत सुरू करणेत यावा.

वरीलप्रमाणे मार्गदर्शक सुचना विचारात घेऊन कार्यवाही करण्यात यावी व कृती कार्यक्रमाची प्रत ८ दिवसांत प्राधिकरणास सादर करावी. तसेच ह्या मार्गदर्शक सुचना निवडणुकीस पात्र सर्व सहकारी संस्थांनाही अवगत कराव्यात.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, पूणे यांच्या मान्यतेनुसार.**

20/05/2020

(यशवंत गिरी)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य , पुणे.